मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# प्रभागाच्या सर्वांगीण विकासाचे 'योगिता' पर्व: सामान्यांमधून उमटलेले खंबीर नेतृत्व

## विकसनशील प्रभाग : 11

पिंपरी : राजकारणात वारसा महत्त्वाचा असतो असं म्हटलं जातं, पण जेव्हा एखादी व्यक्ती केवळ जनसेवेचा ध्यास घेऊन उतरते, तेव्हा ती शून्यातून विश्व निर्माण करते. याचेच उत्तम उदाहरण म्हणजे सौ. योगिता ज्ञानेश्वर नागरगोजे. मुळच्या बीडच्या आणि वारकरी संप्रदायाचा वारसा जपणाऱ्या योगिता ताईंनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ११ मध्ये आपल्या कामाचा असा ठसा उमटवला आहे की, आज त्या 'जनसेविका' म्हणून घराघरात पोहोचल्या आहेत. भाजपाच्या नेत्या पंकजाताई मुंडे आणि भोसरी विधानसभेचे आमदार महेश दादा लांडगे यांच्या त्या कट्टर समर्थक असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी प्रभागामध्ये विविध कामे पूर्णत्वास नेली आहेत.उर्वरीत कामेही त्या पूर्णत्वास नेणार आहेत.



माझा प्रभाग
माझा उमेदवार!

## विकासकामांचा कायापालट

गेल्या २५ वर्षांत जी कामे प्रलंबित होती, ती ताईंनी आपल्या कार्यकाळात पूर्ण करून दाखवली. प्रभागाचा चेहरामोहरा बदलणारी काही प्रमुख कामे खालीलप्रमाणे आहेत: पिंपरी-चिंचवड शहराच्या वैभवात भर घालणारे अटल बिहारी वाजपेयी उद्यान व मोबाईल अन् इंटरनेचट्या जाळ्यात गुरफटलेली तरूण पिढीला मातीत खेळण्यासाठी दीनदयाळ उपाध्याय क्रीडांगण: आरोग्य आणि क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन देणारे राष्ट्रीय दर्जाचे प्रकल्प. कुदळवाडी परिसरात डिजिटल शाळा साकारण्यात आली. घरकुलच्या चहु बाजूने संरक्षक भिंत तसेच घरकुलचे मुख्य प्रवेशद्वार, पूर्णानगर, कृष्णानगर, सुदर्शननगर, तुळजानगर नेवाळे वस्ती, अंजठानगर, भिमशक्तीनगर, दुर्गानगर या ठिकाणी पाण्याच्यालाईन, ड्रेनेज, स्ट्रॉमवॉटरलाईन, शिवतेजनगरमधील सांस्कृतीक हॉल, पूर्णानगरमधील सांस्कृतिक हॉल, पेविंग ब्लॉक, अनेक ठिकाणी ओपन जिम सुरु केली. आरोग्य व शिक्षण: घरकुल रुग्णालय, टाऊन हॉल आणि विद्यार्थ्यांसाठी स्वामी विवेकानंद वाचनालयाचे प्रगतीपथावर असलेले काम.पायाभूत सुविधा: शरद चौक येथील भुयारी मार्ग आणि प्रभागातील सिमेंटचे रस्ते, ड्रेनेज लाईन व पाणी पुरवठ्याचे सक्षमीकरण.












## संघर्ष ते यश: एक जिद्दी प्रवास

योगिता ताईंचा राजकीय प्रवास सोपा नव्हता. कोणताही राजकीय वारसा नसताना, एका सर्वसामान्य कुटुंबातून त्या पुढे आल्या. २०१२ मध्ये पहिल्यांदा निवडणुकीला सामोरे गेल्यावर अवघ्या ५० मतांनी त्यांची संधी हुकली, पण त्या डगमगल्या नाहीत. उलट, अधिक जोमाने सामाजिक कार्यात सक्रिय राहिल्या. त्यांच्या याच जिद्दीला जनतेने २०१७ मध्ये साथ दिली आणि त्या भरघोस मतांनी निवडून आल्या.



## महिला सक्षमीकरण: 'भरारी महिला मंच'

केवळ रस्ते आणि पाणी म्हणजे विकास नव्हे, तर समाजातील महिला सक्षम होणे हा ताईंचा मुख्य हेतू आहे. 'भरारी महिला मंच' च्या माध्यमातून त्यांनी महिलांचा एक मोठा संघ उभा केला आहे. बचत गटांच्या माध्यमातून महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करणे, त्यांना सरकारी योजनांचा (उदा. लाडकी बहीण योजना) लाभ मिळवून देणे आणि त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम ताई जातीने लक्ष घालून करत आहेत.

# प्रभागाच्या सर्वांगीण विकासाचे 'योगिता' पर्व: सामान्यांमधून उमटलेले खंबीर नेतृत्व




## संकट काळातील 'आधार'

कोरोनासारख्या जागतिक संकटात जेव्हा जग थांबले होते, तेव्हा योगिता ताई आणि त्यांचे संपूर्ण कुटुंब रस्त्यावर उतरून लोकांच्या मदतीसाठी धावले. औषध उपचार, धान्य वाटप आणि रुग्णांना बेड मिळवून देण्यासाठी त्यांनी अहोरात्र कष्ट घेतले.

## सामाजिक बांधीलकी

स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेत ताईंनी त्यांचा मोफत विमा उतरवला आहे. समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्याची त्यांची भूमिका त्यांच्या कार्यातून स्पष्टपणे दिसून येते.





## भविष्यातील संकल्प

येत्या काळात योगिता ताईंना झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील (SRA) नागरिकांना दर्जेदार मूलभूत सुविधा पुरवायच्या आहेत. वाढत्या लोकसंख्येनुसार वाहतूक कोंडीवर प्रभावी उपाययोजना करणे आणि प्रभागाचा 'स्मार्ट' विकास करणे हे त्यांचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

## विधायक उपक्रम

भजनी मंडळांना साहित्य वाटप, पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण करून जनजागृती, प्रभागातील विविध कामांचे उद्घाटन, त्याची पाहणी, महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी विविध प्रकारचे प्रशिक्षण शिबिर राबविली, रक्तदान शिबिर, खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी क्रीडा स्पर्धा, आधारकार्ड शिबिर, स्वच्छता अभियान, विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप, पूरग्रस्तांना भरभरून मदत, ज्यामध्ये जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. दिंडीमध्ये फळांचे वाटप, आरोग्य सेविकांना पावसांपासून संरक्षण करण्यासाठी रेनकोटचे वाटप,महिलांसाठी सांस्कृतिक उपक्रम, दिव्यांगाचा सामुहिक विवाह सोहळा असे अनेक उपक्रम राबविले आहेत.

"जनतेने मला ज्या प्रेमाने आणि आत्मीयतेने स्वीकारले, त्याबद्दल मी सदैव कृतज्ञ आहे. आपल्या आशीर्वादाच्या जोरावरच मला पुन्हा नव्या जोमाने जनसेवा करण्याची ऊर्जा मिळते."






